| MHKO110008872025 | **म.कौ.हि.सं.का.अर्ज नं. ११/२०२५**<br>**अमृता जॉन महापुरे**<br>वि.<br>**जॉन सुदाम महापुरे वगैरे** |
| --- | --- |

## नि. ०५ वरील आदेश

सदरचा अर्ज अर्जदार क्र. १ यांनी कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण कायदा २००५ चे कलम २३ अन्वये अंतरिम पोटगी मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

**अर्जदारची कथने संक्षिप्त रुपाने खालीलप्रमाणे :-**

**०२.** अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांचा दि.०७/१२/२०२१० रोजी ख्रीश्चन धर्मशास्त्र रितीरिवाजाप्रमाणे तुषार मल्टीपर्पज हॉल, कोडोली, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर येथे झालेला आहे. सदर विवाह संबंधातून अर्जदार यांना एक मुलगी असून तिचे नाव जेनिफर आहे. गैरअर्जदार क्र. १ हे ज्योतिर्लिंग पब्लीक स्कूल, जाखले, ता. पन्हाळा येथे शिक्षक म्हणून नोकरीस असून त्यांना दरमहा रक्कम रु. ३०,०००/– इतका पगार आहे. तसेच गैरअर्जदार क्र. ३ या देखील मुख्याध्यापिका व गैरअर्जदार क्र. ४ या शिक्षीका आहेत. लग्नानंतर ०२ महिन्यांनी गैरअर्जदार हे अर्जदार यांच्यावर संशय घेऊन त्यांना मारहाण, शिवीगाळ करुन उपाशी ठेवत. अर्जदार क्र. १ या त्यांचे आईवडीलांकडून दैनंदिन आवश्यक वस्तू घेऊन जात असताना देखील गैरअर्जदार हे जाणुनबुजून त्यांच्याशी भांडण करुन रात्रीअपरात्री त्यांना घराबाहेर काढत. अर्जदार क्र. १ यांच्या वडीलांनी सदर कृत्याबद्दल विचारणा केली असता त्यांना देखील गैरअर्जदार यांना शिवीगाळ करुन धमकी दिली व ते निघून गेल्यानंतर अर्जदार क्र. १ यांना बेदम मारहाण केली. गैरअर्जदार क्र. १ यांचे दुस–या महिलेसोबत प्रेमसंबंध आहेत. अर्जदार क्र. १ यांच्या गरोदरपणाच्या अवस्थेमध्ये देखील गैरअर्जदार त्यांना शारीरिक व मानसिक त्रास देत. अर्जदार क्र. १ यांना मुलगी झाल्याचे कारणावरुन गैरअर्जदार यांनी आजतगायत अर्जदार यांची चौकशी केलेली नाही. गैरअर्जदार या पोलीस स्टेशनमध्ये तक्रार देण्यासाठी गेल्या असता गैरअर्जदार यांनी राजकीय बळाचा वापर करुन अर्जदार

क्र. १ यांची तक्रार नोंद करणेस अडथळा केला. दि. २९/०९/२०२४ पासून अर्जदार क्र. १ या आपल्या मुलीसोबत त्यांच्या माहेरी राहत असून गैरअर्जदार यांनी त्यांच्या उदरनिर्वाहाची कोणतीही सोय केलेली नाही. अर्जदार क्र. १ यांच्या आईवडीलांची आर्थिक परिस्थिती हालाखीची असल्याने अर्जदार या स्वतःचा उदरनिर्वाह करणेस सक्षम नाहीत. सबब, गैरअर्जदार यांनी अर्जदार क्र. १ यांच्या उदरनिर्वाहासाठी  रक्कम रु. २५,०००/- तर अर्जदार क्र. २ करिता रक्कम रु. १०,०००/- इतकी पोटगी द्यावी अशी विनंती अर्जदार क्र. १ यांनी केलेली आहे.

**०३.** गैरअर्जदार यांनी सदर अर्जास त्यांचे म्हणणे नि. ०७ खाली दाखल केले आहे. गैरअर्जदार कथन करतात की, अर्जदार क्र. १ यांना गैरअर्जदार यांनी लग्नामध्ये रक्कम रु. ०३ लाखाचे दागिने केलेले होते. गैरअर्जदार क्र. १ यांना नोकरी नसल्याची पूर्वकल्पना असताना अर्जदार क्र. १ चे आईवडीलांना त्यांचा विवाह केला होता. अर्जदार क्र. १ या लग्नानंतर कोणत्याही कारणावरुन भांडण करुन वारंवार घर सोडून जाणेबाबत धमकी देत असत. अर्जदार क्र. १ यांनी कधीही गैरअर्जदार यांचा मान राखलेला नाही. अर्जदार क्र. १ यांना त्यांचे गावातील संबंधीत लोकांनी समजावून देखील त्यांच्या वागण्यात कोणताही फरक पडलेला नाही.  अर्जदार क्र. १ या गरोदर असताना त्यांनी गर्भपाताच्या गोळ्या घेतल्या व घटस्फोट दिला नाही तर जीवाचे बरेवाईट करण्याची धमकी देत असत. अर्जदार क्र.२ यांच्या जन्मावेळी हॉस्पीटलचे सर्व बिल गैरअर्जदार क्र. १ यांनीच भरलेले होते, तसेच बारशाचा खर्च देखील गैरअर्जदार यांनीच केला होता. गैरअर्जदार क्र. १ ते ३ हेच अर्जदार क्र. २ हिचा सांभाळ करत असत. अर्जदार क्र. १ हिचे लग्नापूर्वी प्रेमसंबंध असल्यामुळे त्यांनी गैरअर्जदार यांची फसवणूक करुन लग्न केले होते. गैरअर्जदार हे सुशिक्षीत बेरोजगार आहेत. गैरअर्जदार यांनी अर्जदार क्र. १ हिचा कोणताही छळ केलेला नसून केवळ गैरअर्जदार यांना नाहक त्रास देण्यासाठी व मोठी रक्कम मिळण्याच्या उद्देशाने सदरचा खोटा अर्ज दाखल केलेला आहे. सबब, अर्जदार क्र. १ यांचा अंतरिम पोटगीचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती जाबदार यांनी केली आहे.

०४. अर्जदार व गैरअर्जदार यांच्यातर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अर्जातील कथनांचे अवलोकन केले असता माझ्यासमोर खालील वादप्रश्न उपस्थित होतात व त्याचे कारणमिमांसा व निष्कर्ष खालील प्रमाणे आहेत-

| अ.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार या गैरअर्जदार यांच्याविरुध्द अंतरिम पोटगी आदेश मिळण्यास पात्र आहेत काय ? | **अंशतः होकारार्थी** |
| २. | आदेश कोणता? | **... अंतिम आदेशाप्रमाणे** |

## <u>कारणमिमांसा</u>

०५. अर्जदार यांनी त्यांचे कथनांपृष्ठयार्थ नि. ३ सोबत अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांच्या लग्नाची पत्रीका, विवाहाचे फोटो, विवाह नोंदणी प्रमाणपत्र, अर्जदार क्र. १ यांचे आधार कार्ड, अर्जदार क्र. २ हिंचा जन्मदाखला व अर्जदार क्र. १ यांनी गैरअर्जदार यांच्याविरुध्द दाखल केलेली एन.सी. क्र. ३८१/२०२४ ची प्रत दाखल केलेली आहे. तसेच नि. ०८ वर अर्जदार क्र. १ यांचे मालमत्ता व देणीबाबतचे शपथपत्र दाखल केले आहे.

### <u>वादप्रश्न क्र.१ व २ करिता -</u>

०६. वरील वादप्रश्न एकमेकांशी सलग्न असल्यामुळे त्यांना पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी एकत्रित घेतले आहेत.

०७. गैरअर्जदार यांनी अर्जदाराने प्रस्तुत अर्जामध्ये नमूद केलेली नातेसंबंध नाकारलेले नाहीत. अर्जदार व गैरअर्जदार यांच्यामध्ये वैवाहिक वैमनस्य असल्याबाबत अर्जदार व गैरअर्जदार यांच्या कथनांमधुन दिसुन येत आहे. अर्जदार या सध्यस्थितीला माहेरी राहत आहे. अर्जदार क्र. १ या दि. २९/०९/२०२४ पासून माहेरी राहत असल्यापासुन त्यांच्या मुलभूत गरजा गैरअर्जदार यांनी पुर्ण करण्याकरीता कोणत्याच स्वरुपाची आर्थिक मदत केल्याचे दिसुन येत नाही. अर्जदार हिने गैरअर्जदार यांच्याकडुन पोटगी मिळण्याकरीता विनंती केलेली आहे, असे दिसत आहे. गैरअर्जदार हे अर्जदार क्र. १ यांचे पती व अर्जदार क्र. २ हिचे वडील या

नात्याने सांभाळ करण्याची संपुर्ण जबाबदारी त्यांच्यावर असतांना देखील संपुर्ण जबाबदारी नाकारुन आर्थिकदृष्ट्या दुर्लक्ष केल्याचे दिसत आहे. अर्जदार क्र. १ या सध्या कोणत्याही स्वरुपाचा व्यवसाय किवा नोकरी करत नाहीत हे स्पष्ट दिसत आहे. अर्जदार यांच्या मुलभूत गरजांची कोणतीच पुर्तता गैरअर्जदार यांनी केलेली नाही. अर्जदार क्र. १ व २ यांना आर्थिक मदत न मिळाल्यामुळे त्या स्वत:च्या मुलभूत गरजा पुर्ण करू शकत नाही. सदरचे गैरअर्जदार यांचे वर्तन हे कौटुंबिक व आर्थिक हिंसाचारामध्ये मोडते.

**०८.** अर्जदार क्र. १ यांनी गैरअर्जदार यांच्याकडुन पोटगी स्वरूपात रू. २५,०००/- व अर्जदार क्र. २ हिचेकरिता रक्कम रु. १०,०००/- मिळावे अशी विनंती केली आहे. अर्जदार क्र. १ हिने अर्जामध्ये कथन केले की, गैरअर्जदार क्र. १ हे शिक्षक म्हणून नोकरीस असून त्यातून त्यांना दरमहा रक्कम रु. ३०,०००/- इतके उत्पन्न मिळते. अर्जदार क्र. १ हिने अर्जामध्ये कथन केले की, गैरअर्जदार क्र. १ हे ज्योतिर्लिंग पब्लीक स्कूल, जाखले, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर येथे शिक्षक म्हणून नोकरीस आहेत, परंतू गैरअर्जदार क्र. १ हे शिक्षक म्हणून नोकरीस आहेत या अनुषंगाने पुरावा दाखल केलेला नाही.

**०९.** अर्जदार यांच्या वकिलांनी युक्तीवाद केला की, गैरअर्जदार हे अर्जदार यांना आर्थिक मदत देण्यास समर्थ आहे, कारण गैरअर्जदार यांना नोकरीतून उत्पन्न मिळते. याउलट गैरअर्जदार यांच्या वकिलांनी युक्तीवादामध्ये कथन केले की, गैरअर्जदार यांना खाजगी नोकरीतून पुरेसे उत्पन्न मिळत नाही. तसेच गैरअर्जदार यांच्या आईवडीलांच्या पालणपोषणाची व औषधोपचाराची संपूर्ण जबाबदारी त्यांच्यावर आहे. अर्जदार ही शिक्षीत असून ती स्वतः कमवून स्वतःची उपजिवीका करण्यास समर्थ आहे. तसेच अर्जदार ही तिच्या सोबत कौटूंबिक हिंसाचार झाला आहे ही बाब शाबित केलेली नाही, त्यामुळे अर्जदार ही आर्थिक मदत मिळण्यास पात्र नाही.

**१०.** कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण कायदा २००५ चे कलम २३ अन्वये अंतरिम पोटगीचा आदेश करताना अर्जदार हिने प्राथमिक स्वरुपात

तिच्या सोबत हिंसाचार झाला आहे किंवा नाही हे दाखवावे लागते. मुद्दा क्र. १ मध्ये या अनुषंगाने त्याबाबत निष्कर्ष देण्यात आलेला आहे.

**११.** गैरअर्जदार यांनी अर्जदार क्र. १ व २ यांच्या अन्न, वस्त्र व निवारा या गरजा पुर्ण करण्याची जबाबदारी असते. परंतु सदरच्या गरजा त्यांनी पुर्ण केलेल्या नाहीत. अर्जदार क्र. १ ही मुलीसोबत सध्या माहेरी राहत आहे, त्यामुळे त्यांच्या दैनंदिन गरजा पूर्ण होण्याकरीता आर्थिक मदतीची आवश्यकता असणार आहे. गैरअर्जदार क्र. १ हा अर्जदार हिस नांदवणेस तयार असेल तरी अर्जदार ही सद्यस्थितीला गैरअर्जदार याच्यासोबत राहत नाही. गैरअर्जदार याने अर्जदार यांनी जबाबदारी नाकारल्यामुळे अर्जदार ही गैरअर्जदारकडुन पोटगी मिळण्यास पात्र आहे. अर्जदार यांना पोटगीची रक्कम ठरवितांना गैरअर्जदार यांचा उत्पन्नाचा स्त्रोत व त्यांच्यावर असणा-या जबाबदा-यांचा विचार करावा लागतो. गैरअर्जदार याने अर्जदार हिच्या पालन-पोषणाची संपुर्ण जबाबदारी नाकारलेली आहे. गैरअर्जदार याने अर्जदार हिचा आर्थिक हिंसाचार केलेला असुन अर्जदार यांची कोणतीच जबाबदारी न घेतल्यामुळे अर्जदार क्र. १ यांना सदरचा अर्ज दाखल करणे भाग पडले आहे. याच बरोबर गैरअर्जदार यांचे मासिक उत्पन्न व त्यांच्या आईवडीलांचा औषधोपचाराचा खर्च याबाबी देखील विचारात घ्याव्या लागणार आहेत. अर्जदार यांच्या मुलभूत गरजा, अर्जदार यांचे शिक्षण, गैरअर्जदार यांचे उत्पन्न व त्यांच्या वर असणा-या जबाबदा-या या सर्व बाबींचा विचार केला असता अर्जदार क्र. १ व २ यांच्या मुलभूत गरजा पुर्ण करण्याची जबाबदारी गैरअर्जदार क्र.१ यांचेवर असल्यामुळे अर्जदार यांच्या मुलभूत गरजांचा विचार करून अर्जदार क्र.१ यांना दरमहा रक्कम रु. २०००/-(अक्षरी दोन हजार मात्र) व अर्जदार क्र.२ यांना दरमहा रक्कम रु. १०००/-(अक्षरी एक हजार मात्र) पोटगीचा आदेश देणे न्यायोचित होईल. अर्जदार ही कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण कायदा २००५ चे कलम २३ अन्वये पात्र आहे. त्यामुळे मी वादप्रश्न क्र. १चे उत्तर अंशतः होकारार्थी देत आहे. वादप्रश्न क्र. २ बाबत खालील आदेश पारीत करणेत येतो.

**-: आदेश :-**

०१. अर्ज अंशतः मंजुर करणेत येत आहे.

०२. गैरअर्जदार क्र. १ यांनी मुळ अर्जाच्या अंतिम निकालापर्यंत अर्जदार क्र.१ यांना दरमहा रक्कम रु. २०००/-(अक्षरी दोन हजार मात्र) व अर्जदार क्र.२ यांना दरमहा रक्कम रु. १०००/-(अक्षरी एक हजार मात्र) इतकी अंतरिम पोटगी प्रस्तुत आदेशापासुन अदा करावी.

०३. सदर आदेशाची प्रत पक्षकारांना विनामुल्य देणेत यावी.

(आदेश खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by JYOTI NITIN BHASME
Date: 2026.03.24 17:42:17 +0530

**दिनांक- २४/०३/२०२६.**

**(जे .एन. भस्मे)**
**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, पेठवडगाव**